पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc-pcpc@mah.gov.in



जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/कार्तिकी/6003458/२०२६ दिनांक -26/११/२०२६

वाहतूक नियंत्रण अधिसुचना

दि.०१/१२/२०२६ ते ०८/१२/२०२६ रोजी दरम्यान श्री क्षेत्र आळंदी येथे कार्तिकी यात्रा भरणार आहे. दि.०४/१२/२०२६ रोजी कार्तिकी एकादशी तसेच ०६/१२/२०२६ रोजी संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७२९ वा संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीमध्ये महाराष्ट्राच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातुन सुमारे १० ते १५ लाख भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यापैकी बहुसंख्य भाविक हे आळंदी येथून देहूगाव येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर, गाथा मंदिर व भंडारा डोंगर येथे मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी जात असल्याने आळंदी तसेच देहुगाव येथे वाहतूक कोंडी होत असल्याने सदर ठिकाणचे वाहतुकीत बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी विक्रांत देशमुख, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

दिघी-आळंदी/देहुरोड/चिखली/ चाकण/तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत

अ.क्र	प्रवेश बंदी करण्यात येणारा मार्ग	पर्यायी मार्ग
१.	मोशी चौक येथुन आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	१. जयगणेश साम्राज्य चौक→ अलंकापुरमचौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी मार्गे इच्छित स्थळी २. भोसरी चौक → मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी ३. मोशी-चाकण→ शिक्रापुर मार्गे इच्छित स्थळी
२.	भारतमाता चौक, मोशी येथुन आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	१. जयगणेश साम्राज्य चौक→ अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी २. भोसरी चौक → मॅगझीनचौक मार्गे विश्रांतवाडी ३. मोशी-चाकण ते शिक्रापुर मार्गे इच्छित स्थळी जातील.
३.	चिंबळीफाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	१. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी २. भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी
४.	आळंदी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	१. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी २. भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे
५.	माजगाव फाटा चाकण ते आळंदी जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	१. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी २. भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे
६.	चाकण-शेल पिंपळगाव -वडगांव घेणंद मार्गे आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	कोयाळी कमान, कोयाळी→ मरकळगाव मार्गे

Scanned with OKEN Scanner

७.	पुणे-दिघी मॅगझीन चौक मार्गे आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहणांना प्रवेश बंद	१. भोसरी मार्गे→ मोशी→ चाकण २. अलंकापुरम→जयगणेश साम्राज्य चौक मार्गे-चाकण ३. चऱ्होली फाटा → धानोरीफाटा मार्गे- मरकळ पुणे
८.	मरकळमार्गे आळंदीकडे येणाऱ्या जड अवजड वाहणांना प्रवेश बंद	धानोरी फाटा→ चऱ्होली फाटा मार्गे भोसरी-विश्रांतवाडी
९.	भोसे फाटा चाकण ते आळंदी जड अवजड वाहनांना प्रवेश बंद	कोयाळी कमान, कोयाळी→ मरकळगाव मार्गे
१०.	देहुगाव कमान(जुना मुंबई-पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद	भक्ती-शक्ती चौक → त्रिवेणीनगर → तळवडे गावठाण → कॅन बे चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.
११.	कॅनबे चौक येथून देहुगावात जाणाऱ्या सर्व जड अवजड वाहतुकीस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	
१२	तळेगाव-चाकण रोड वरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या जड अवजड वाहतुकीस प्रवेश बंद	सदर मार्गावरील वाहने एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी जातील
१३	देहु कमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील.	परंडवाल चौक → साईराज चौक ते भैरवनाथ चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.

वरील प्रमाणे अ.क्र १ ते ११ मध्ये नमुद केलेल्या मार्गावर सर्व प्रकारच्या जड अवजड (अत्यावश्यक सेवेतील तसेच दिंडीतील वाहने वगळून) वाहतुकीस दिनांक ०१/१२/२०२६ रोजी ००.०१ ते ०८/१२/२०२६ रोजी २४.०० वाजेपावेतो प्रवेश बंद करण्यात येत आहे.

तसेच खालीलप्रमाणे दिनांक ०१/१२/२०२६ रोजी ००.०१ ते ०८/१२/२०२६ रोजी २४.०० वाजेपावेतो सर्व प्रकारच्या (अत्यावश्यक सेवेतील तसेच दिंडीतील वाहने वगळून) वाहनांना आळंदी शहरामध्ये जाण्यास प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

अ.क्र	वाहतुकीस बंद करण्यात येणारा रस्ता	रस्ता बंद करण्यात येणारे ठिकाण
१.	पुणे → आळंदी रस्ता	चऱ्होलीफाटा चौक
२.	मोशी → आळंदी रस्ता	डुडूळगाव जकातनाका
३.	चिंबळी → आळंदी रस्ता	केळगांव चौक / बोपदेव चौक
४.	चाकण (आळंदी फाटा) → आळंदी रस्ता	इंद्रायणी हॉस्पीटल
५.	वडगांव घेणंद मार्गे → आळंदी रस्ता	विश्रांतवड
६.	मरकळ → आळंदी रस्ता	धानोरेफाटा/पीसीएस चौक

देहू तसेच आळंदीकडे दर्शनासाठी येण्याच्या मार्गावरील भाविकांचे वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था –

अ.क्र	वाहनांचा मार्ग	पार्किंगचे ठिकाण
१.	देहुगांव,मोशी,हवालदार वस्ती फाटया कडुन येणारी वाहने	आळंदी → देहु रोड → तळेकर पाटील चौक(दक्षिणेस) - २ एकर
२.	देहुगांव,मोशी,हवालदार वस्ती फाटया कडुन येणारी वाहने	वहिले पार्किंग आळंदी→ देहु रोड → तळेकर पाटील चौक(उत्तरेस) -१ एकर
३.	देहुगांव,मोशी,हवालदार वस्ती फाटया कडुन येणारी वाहने	आदित्य इंटरनॅशनल स्कुल डुडुळगाव १० गुंठे (पोलीसाच्या वाहनांना करिता)
४.	देहुगांव,मोशी,हवालदार वस्ती फाटया कडुन येणारी वाहने	ज्ञानविलास कॉलेज डुडुळगाव जकातनाका जवळ - १० गुंठे (पोलीसाच्या वाहनांना करिता)

Scanned with OKEN Scanner

५.	आळंदी तसेच चिंबळी फाटयाकडुन येणारी वाहने	मुंगसे पार्किंग बोपदेव चौक - ४.५ एकर
६.	चाकण आळंदी फाटयाकडुन येणारी वाहने	इंद्रायणी हॉस्पीटल समोर (चाकण रोड) ९ एकर
७.	वडगांव घेणंद शेल पिंपळगांव कडुन येणारी वाहने	विश्रांतवड वडगाव रोड २५ एकर
८.	वडगांव कडुन येणारी वाहने	वडगांव चौक आळंदी शौचालया जवळील नगरपरिषद पार्किंग ३० गुंठे
९.	मरकळ गावकडून येणारी वाहने	पॉलीबॉड कंपनी समोर ०४ एकर गावडे पार्किंग
१०	मरकळ गावकडून येणारी वाहने	प्ल्युमेरिया मंगल कार्यालय २० गुठे
११.	मरकळ गावकडून येणारी वाहने	बैलगाडा घाट चऱ्होली ०१ एकर
१२.	पुणेकडून येणारी वाहने	मुक्ताई मंगल कार्यालय समोर (पुणेकडून येणाऱ्या वाहनांसाठी) ०१ एकर

आळंदी येथून जाणाऱ्या एस.टी/पीएमपीएमएल बसची स्टॅण्ड ची ठिकाणे

अ.क्र	ठिकाण	मार्ग
१	देहुगांवकडे जाण्याकरीता	एस टी/पीएमपीएमएल बस डुडुळगांव जकातनाका
२	पुणे बाजुकडे जाणे/ येणे करीता	एस टी/पीएमपीएमएल बस चऱ्होली फाटा
३	वाघोली-शिक्रापुर कडे जाणे/येणे करीता	एस टी/ पीएमपीएमएल बस धानोरे फाटा चौक
४	चाकण कडे जाणे/ येणे करीता	एस टी हनुमानवाडी,इंद्रायणी हॉस्पीटल विशाल हॉटेल समोर
५	शिक्रापुर/शेलपिंपळगांव/नगरकडे जाणे/येणे करीता	एस टी विश्रांतवड फाटा/चौक (वडगांव रोड)

तरी वरील प्रमाणे दि. ०१/१२/२०२६ रोजी ००.०१ ते ०८/१२/२०२६ रोजी २४.०० वा पर्यंत देहुकडे तसेच आळंदी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (दिंडीतील वाहने व अत्यावश्यक सेवेची वाहने वगळुन) आवश्यकतेनुसार प्रवेश बंदी करण्यात येत आहे तसेच येणाऱ्या भाविकांसाठी पार्किंगची तसेच बस स्टॅण्डची ठिकाणे निश्चित करण्यात आलेली आहेत. तरी वरीलप्रमाणे वाहतुकीत बदल केलेबाबत अधिसुचना (नोटिफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

नागरीकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

(विक्रांत देशमुख)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त साो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी दिघी आळंदी, चिखली, चाकण, तळेगाव,देहुरोड वाहतुक विभाग व पो.स्टे प्रभारी अधिकारी
/- सदर वाहतुक बदलाचे अनुषंगाने प्रवेश बंदी केलेल्या ठिकाणी बॅरीगेटींग करुन योग्य तो पोलीस बदोबस्त नेमावा.

४) मा. मुख्याधिकारी आळंदी, नगरपरिषद, आळंदी, देहूरोड नगरपंचायत, देहुरोड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner